| | |
|---|---|
| MHGA030007192025 | दाखल तारीख : २४.०६.२०२५<br>नोंदणी तारीख : २४.०६.२०२५<br>निकालतारीख : ११.०५.२०२६<br>कालावधी : ००वर्ष,१०म.,१९दि.<br><br>**निशाणी क्रमांक : १० पुढे** |

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, गडचिरोली यांचे न्यायालय**<br>**समक्ष : श्रीमती वासंती. र. मालोदे**<br>**न्यायनिर्णय पारीत दिनांक : ११/०५/२०२६**<br>**संक्षिप्त फौजदारी मामला क्रं.४३०/२०२५** |
| | **गुन्हा क्र.०९३४/२०२४** |
| फिर्यादी/तक्रारकर्ता | महाराष्ट्र शासन तर्फे,<br>पोलीस स्टेशन, गडचिरोली,<br>ता.जि. गडचिरोली. |
| आरोपी | **प्रफुल्ल विनोद पाल,**<br>वय : २४ वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>राह.गोकुळनगर वार्ड क्र.२३,<br>गडचिरोली, ता.जि. गडचिरोली. |
| आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ | श्री एन. एस. उंदिरवाडे, |

**भाग-ब**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | १२.१२.२०२४ |
| प्रथम खबरी अहवालाची तारीख | १३.१२.२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २४.०६.२०२५ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | ०८.०९.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १६.०४.२०२५ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची | ...... |
| न्यायनिर्णयाची तारीख | ११.०५.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | निरंक |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | गुन्हा दाखल केलेसह | निर्दोष सुटला की नाही किंवा दोषी | शिक्षा ठोठावली | फौजदारी व्यवहार संहितेचे कलम ४२८ अन्वये खटल्यामध्ये न्यायालयाच्या कक्षेदरम्यान तुरुगांत राहल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **प्रफुल्ल विनोद पाल** | आरोपीला अटक करण्यात आली नाही. आरोपीस सुचनापत्रावर सोडण्यात आले. | ०८.०९.२०२५ | ६५(अ), ९८(क) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम | निर्दोष | निरंक | निरंक |

## भाग - क

**अ. अभियोग पक्ष**

| अनु.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सरकारी पक्षाचे सा.क्र.१ | शुभम सुधाकर खोब्रागडे | घटनास्थळ जप्ती पंच साक्षीदार |
| सरकारी पक्षाचे सा.क्र.२ | मोहसिन शौकतखॉ पठाण | घटनास्थळ जप्ती पंच साक्षीदार |

## सरकारी पक्ष/बचाव पक्ष/ न्यायालयीन निशानीची यादी

**ब. सरकारी पक्ष**

| अ.क्र. | निशानी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशानी :**

| अ.क्र. | निशानी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १. | २ | सि.ए.रिपोर्ट |

**न्या य नि र्ण य**

(दिनांक ११.०५.२०२६ रोजी पारीत)

आरोपी अवैधरित्या देशी दारु विनापरवाना विक्रीकामी बाळगुन असतांना मिळुन आल्याने त्याच्या विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(अ), ९८(क) अन्वये खटला चालविण्यात आला. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांचा तर आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण झाले व त्यासंबंधी निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दिनांक १२.१२.२०२४ रोजी २०.०० ते २१.३१ वाजताच्या दरम्यान मौजा गोकुलनगर, बाय पास रोड, गडचिरोली, ता. जि. गडचिरोली येथे आरोपीच्या वाहनाच्या डिक्कीमध्ये प्रत्येकी दोन लिटर क्षमतेचे, रॉयल स्टॅग कंपनीचे एकुण ३ नग सिलबंद विदेशी दारुच्या बॉटल्या अवैद्यरित्या बाळगुन वाहतुक करीत असतांना मिळून आला? | **...नाही.** |
| २. आदेश काय ? | **...अंतिम आदेशानुसार.** |

**का र ण मि मां सा**

२. अभियोजन पक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी दोन्ही घटनास्थळ जप्ती पंच साक्षीदार तपासले. त्यानंतर अभियोग पक्षाचा पुरावा नि.क्र.१ च्या आदेशानुसार बंद केला. आरोपी विरुध्द गुन्हादर्शक पुरावा आढळुन न आल्याने त्याचे बीएनएसएसचे कलम ३५१ नुसार बयान नोंदविण्यात आले नाही. सदर प्रकरणात आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करायचा असेल तर आरोपी हा अवैधरित्या त्याच्या ताब्यात विनापरवाना विदेशी दारू बाळगुन वाहतुक करीत असतांना मिळून आला हे अभियोग पक्षाला सिध्द करणे आवश्यक आहे.

**मुद्दा क्र.१ करीता :-**

३. अभियोग पक्षाने घटनास्थळ जप्ती पंच शुभम सुधाकर खोब्रागडे (स.सा.क्र.१) व मोहसिन शौकतखॉ पठाण (स.सा.क्र.२) यांना नि.क्र.१० पुढे तपासले असता, ते घटनेबद्दल किंवा जप्तीबद्दल काहीही सांगत नाहीत. तथापी, त्यांना अभियोग पक्षातर्फे सुचक प्रश्न विचारुन सुध्दा त्यांनी अभियोजन पक्षाला समर्थन केले नाही. जो मुद्देमाल जप्त केला,

त्याबद्दल पंच साक्षदार काहीही कथन करीत नाही. त्यामुळे, आरोपी विदेशी दारू बाळगुण वाहतुक करीत असतांना मिळून आला, ही बाब सिध्द होत नाही, कारण, त्यासाठी घटनास्थळ पंचनामा आणि जप्तीपत्रक सिध्द होणे गरजेचे आहे. या प्रकरणामध्ये पंच साक्षदारांनी अभियोग पक्षाच्या कथनाला समर्थन न केल्यामुळे सदरची दारू आरोपीच्या ताब्यात असल्याबाबत सिध्द झाली नाही. त्यामुळे अशा परिस्थीतीत इतर साक्षीदार तपासले असते तर नुसती औपचारीकता झाली असती.

४. जर पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षाला समर्थन करीत नाही, आरोपीकडुन काहीही जप्त झाले असे म्हणता येणार नाही. त्यामुळे, अभियोग पक्षाने त्याचेविरुध्द कोणताही गुन्हादर्शक मजकुर अभिलेखावर आणला नाही. सदर प्रकरणात पंच साक्षदारांनी अभियोग पक्षाला समर्थन न केल्याने नि.क्र.०१ वरिल आदेशानुसार पुरावा बंद केला.

५. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. विशेष सहायक सरकारी अभियोक्ता यांनी पंच साक्षदाराने समर्थन न केल्याने न्यायालयाने योग्य तो आदेश पारीत करावा असे म्हणणे मांडले. त्यावर आरोपीतर्फे युक्तीवाद करण्यात आला की, घटनास्थळ पंचनामा आणि जप्तीपत्रक सिध्द झाला नसल्याने आरोपीला निर्दोष मुक्त करावे. सदर प्रकरणात पंचांनी अभियोजन पक्षाला समर्थन न केल्याने पंचनामा सिध्द झाला नाही आणि आरोपीच्या ताब्यात विदेशी दारू बाळगुन वाहतुक करीत होता, ही बाब अभियोग पक्ष सिध्द करु शकला नाही. महत्वाचे म्हणजे या प्रकरणात सी.ए. परिक्षण अहवाल नि.क्र.०२ वर दाखल केलेला असून सुध्दा तो सिध्द झालेला नाही. त्यामुळे जप्त केलेले द्रव्य हे विदेशी दारु होती ही बाब अभियोग पक्षाने संशयापलीकडे जावुन सिध्द केलेली नाही. त्यामुळे अशा परिस्थीतीत आरोपीला संशयाचा फायदा मिळणे न्यायसंगत आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी दर्शविते.

**<u>मुददा कं.२ करिता :-</u>**

६. वरिल सर्व बाबींचा सारासार विचार करता, अभियोग पक्ष आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(अ), ९८(क) अन्वयेचे आरोप सिध्द करण्यास अपयशी ठरलेला आहे. म्हणुन आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. जप्त मुद्देमाल विदेशी दारू अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क, गडचिरोली यांचेकडे योग्य विल्हेवाटीकरीता पाठविण्यात यावी, असे आदेशित करणे उचित ठरते. त्यानुसार, प्रश्न क्र.२ च्या उत्तरार्थ मी खालील आदेश पारीत करते.

**आदेश**

१ आरोपी **प्रफुल्ल विनोद पाल** याची बीएनएसएसचे कलम २७८(१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ कलम ६५(अ), ९८(क) या गुन्हयाच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जमानती बंधपत्र रदद् करण्यात येते.

३. आरोपीने बीएनएसएसचे कलम ४८१ प्रमाणे जामीनाची पुर्तता करावी.

४. जप्त मुद्देमाल विदेशी दारू अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क, गडचिरोली यांचेकडे नियमानुसार योग्य विल्हेवाट लावण्याकरीता पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

VASANTI RAGHUNATH MALODE Digitally signed by VASANTI RAGHUNATH MALODE Date: 2026.05.11 17:32:29 +0530

स्थळ : गडचिरोली. **(व्ही.आर.मालोदे)**
दिनांक : ११/०५/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.१), गडचिरोली.